संशोधन आराखडा

“ कार्ल मार्क्स आणि नारायण मेघाजी लोखंडे यांच्या कामगार चळवळीचा तुलनात्मक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिकशास्त्रे विद्याशाखेअंतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी) या पदवीकरीता सादर केलेला

शोध प्रबंधाचा सारांश

संशोधक

कोमल गणपतराव दुथडे

M.A. ,B.ED

मार्गदर्शक

प्रा. डॉ. प्रकाश संभाजी वाघमारे

इतिहास विभाग प्रमुख व संशोधन

मार्गदर्शक, नारायणराव वाघमारे महाविद्यालय,

आखाडा बाळापुर, जि. हिंगोली.

अं. क्रं. तपशील

- प्रास्ताविक
- संशोधन प्रबंधाचे शिर्षक
- संशोधन विषयाची व्याप्ती आणि मर्यादा
- संशोधन विषयाची उदिष्टये
- संशोधन विषयाची गृहितके
- संशोधन पद्धतीची साधने
  - प्राथमिक साधने
  - दुय्यम साधने

संशोधन आराखडा / प्रकरण नियोजन

1) प्रास्ताविक
2) कार्ल मार्क्स यांचे प्रारंभिक जीवन
3) कार्ल मार्क्स यांचा कामगार चळवळीतील सहभाग आणि कार्य
4) Thas capital आणि कार्ल मार्क्स
5) नारायण मेघाजी लोखंडे यांचे प्रारंभिक जीवन
6) नारायण मे. लोखंडे यांचा कामगार चळवळीतील सहभाग आणि कार्य
7) दीनबंधु सत्यशोधक चळवळ आणि प्लेग निवारणसंबंधी कार्य
8) नारायण मे. लोखंडे यांना मिळालेले मानसन्मान आणि त्यांचे साहित्य
9) कार्ल मार्क्स आणि नारायण मे लोखंडे यांच्या कामगार चळवळीचा तुलनात्मक अभ्यास निष्कर्ष संदर्भग्रंथसुची

प्रास्ताविक

विषमता आणि वैगुण्याने ग्रासलेल्या प्रस्थापीत आर्थिक सामाजिक, राजकीय व्यवस्थेला नष्ट करण्यासाठी आणि नवसमाज तथा राज्याच्या उभारणीसाठी आपल्या विचारांची मांडणी आणि अंमलासाठी खडतर प्रयत्न अनेक विचारवंत आणि सुधारकांनी केले आहेत. राजकीय विचारवंत हा तत्वज्ञही असतो आणि सामाजिक शास्त्रज्ञही असतो. त्यास सभोवतालच्या परीस्थीतीत दिसणारी विसंगती ज्ञात होते. ती विसंगती संपुष्टात आणण्यासाठी तो आपल्या प्रज्ञा व प्रतिभेने उत्तर शोधत असतो. आणि उत्तर सापडले की तो नमुद करतो, आचरणात आणण्यासाठी झगडत असतो. कोणताही विचार किंवा विचारवंत हा तत्कालीन परीस्थीतीचा आपत्य असतो. कोणताही विचार किंवा कार्य हे त्याच काळापुरते बंदीस्त करता येत नाही. त्या विचारांची सार्वत्रिकता आणि त्रिकालबाधीत तत्वे ही कोणत्याही काळातील सामाजिक आणि राजकीय प्रश्नांवर उपाय ठरु शकतात. म्हणुन असे विचार, तत्व आणि त्यांची अंमलबजावणी याचा शोध घेणे क्रमप्राप्त ठरते.

18 व्या शतकामध्ये युरोपात औद्योगिक क्रांतीला सुरुवात झाली. दैनंदीन जीवनातील प्रत्येक पैलुवर कोणत्या ना कोणत्या प्रकारे प्रभाव पडला. औद्योगिक क्रांतीमुळे सामाजिक रचनेच्या दृष्टीने मध्यमवर्गीय उद्योगपती आणि व्यापारी यांचा मातब्बर आणि सभ्य वर्गावर विजय झाला व भांडवलदार आणि कामगार वर्ग उदयास आला.

इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीने जी नवीन अर्थव्यवस्था भांडवलशाही निर्माण झाली तीने शोषीतांचा श्रमीक वर्ग आणि शोषकांचा श्रीमंत वर्ग अशा 2 विभागात समाजाचे विभाजन केले. श्रीमंत अधिक श्रीमंत तर गरीब अधिक गरीब होत गेले. त्यातुन भांडवलशाहीविरोधी विचारांचा अग्रस्थानी आहेत.

भारताचा विचार करता ब्रिटिशांची एक वसाहत म्हणुन ब्रिटीशांनी आपल्या सोईसाठी भारततही कारखाने आणि उद्योगाची उभारणी केली. महाराष्ट्रात औद्योगिक विकास आणि उद्योगाच्या स्वरुपामध्ये मोठे बदल होत गेले. मुंबई प्रांतात श्री कावसजी दावर यांनी "स्पीनिंग अँड विव्हींग कंपनी" ही पहिली गिरणी सुरु केली. (7 जुलै 1854)

भारतातील कामगार जगतात मुंबई नगरीचा सिंहाचा वाटा आहे. औद्योगिक विकासाबरोबरच भांडवलदार आणि कामगार वर्गाचा उदय झाला. परिणामी अधिक नफा मिळवण्याची चढाओढ भांडवलदार वर्गामध्ये निर्माण झाली त्याचा बळी कामगारवर्गाला द्यावा लागला. कुशल अकुशल कामगारवर्गाची होणारी पिळवणुक, कामाचे अनियंत्रित तास, काम आणि पगारासंबंधीचे अनिश्चीत धोरण, अल्पसा मोबदला अशा अनेक प्रश्नांवर अजुन वाचा फुटणे बाकी होते.

भारतीय कामगार चळवळीची मुळ प्रेरणा महात्मा ज्योतीराव फुले यांची असुन तीचा उदय मुंबईमध्ये झाला. सत्यशोधक चळवळीचे खंदे समर्थक आणि महात्मा ज्योतीराव फुले याचे सहकारी नारायण मेघाजी लोखंडे यांनी आपल्या संघटन कौशल्य, कल्पकता आणि दुरदृष्टीचा वापर करुन कामगारांची संघटना बांधण्याचे ठरवले. सत्यशोधक समाजाचे मुखपत्र असलेले "दिनबंधु" हे वृत्तपत्र त्यांनी मुंबईहुन प्रकाशीत करण्यास सुरुवात केली. कामगारांच्या

शोषनविरोधात आवाज उठवला आणि भारतातील पहिली कामगार संघटना स्थापन केली. आणि कामगार चळवळीचे जनक झाले.

प्रस्तुत अभ्यासामध्ये कार्ल मार्क्स आणि नारायण मेघाजी लोखंडे यांच्या कामगार चळवळीचा तुलनात्मक अभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधन प्रबंधाचे शिर्षक

कार्ल मार्क्सने आपले आयुष्य आर्थीक सामाजिक पिळवणुकीपासुन मानवास मुक्त करण्यासाठी खर्च केले. भारतातील सामाजिक स्तरांचे विवेचन आणि इतर भेदांचे विषय साम्यवाद्याच्या कार्यक्रमपत्रीकेवर त्याकाळी तरी ठळकपणे आलेच नाही. केवळ भांडवलदार, कामगार वर्गाव्यतीरीक्त भारतातील कामगारवर्गामध्ये इतरही भेद अस्तीत्वात होते. त्यामध्ये जातीभेद, वर्णभेद, लींगभेद, बालकामगार, अपंग कामगार, इ. चे उदाहरण देता येईल. त्या अनुषंगाने नारायण मेघाजी लोखंडे यांनी कामगार चळवळीसाठी केलेले कार्य उल्लेखनीय आहे. या बाबी समोर ठेऊन. “कार्ल मार्क्स आणि नारायण मेघाजी लोखंडे यांच्या कामगार चळवळीचा तुलनात्मक अभ्यास या शिर्षक विषयाचे प्रयोजन करण्यात आले आहे.

संशोधन विषयाची निवड आणि महत्व

उत्पादन प्रक्रियेतील घटकापैकी कामगार या सजीव घटकाला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. कामगाराला आपले श्रम विकुन त्याचा मोबदला मिळत असतो. परंतु कारखानदारी आणि भांडवलदारांचा मुळ उद्देश हा नफा असतो. मुक्त व्यापारधोरण आणि कामगार चळवळ जागतिक भांडवलशाही आणि कामगार या दोन्ही मुद्यांच्या विश्लेषणाबरोबरच इतर प्रश्न यांची चिकीत्सा करणे आवश्यक आहे.

कार्ल मार्क्स यांनी कामगार क्रांतीचा सिध्दांत मांडला. थोडक्यात कार्ल मार्क्स कामगारांना वर्गाच्या चौकटीत बंदीस्त करतो तर लोखंडे यांच्या कामगार चळवळीतील जात, वर्ण, लिंगभेद इ. ला मार्क्सचे तत्वज्ञान अमान्य करते.

त्यामुळे कार्ल मार्क्स आणि नारायण मेघाजी लोखंडे यांच्या कामगार चळवळीचा तुलनात्मक अभ्यास सदर संशोधनातुन करण्यात येणार आहे.

सोबतच कार्ल मार्क्स यांच्या समकालीन असलेले नारायण मेघाजी लोखंडे यांचेही कार्य महत्वपुर्ण आहे परंतु काही प्रमाणात उपेक्षीत असलेल्या कामगार चळवळीची तुलना प्रस्तुत संशोधनामध्ये करण्यात येणार आहे.

संशोधन विषयाची व्याप्ती आणि मर्यादा

कार्ल मार्क्स यांचा जन्म 5 मे 1818 साली झाला. आणि मृत्यु 1883 ला झाला. भारतातील कामगार चळवळीचे जनक नारायण मे. लोखंडे यांचा जन्म 1848 आणि मृत्यु 1897 रोजी झाला.

वरील दोन्ही विचारवंत समकालीन होते. परंतु प्रसारमाध्यमांची अनुपलब्धता आणि प्रतिकुल परीस्थीती यामुळे परस्परांचे विचार आणि चळवळ एकमेकांपर्यत पोहोचली नसावी. कार्ल मार्क्स आणि नारायण मे. लोखंडे या दोघांनीही कामगार चळवळीतील कार्याला वाहुन घेतले होते. त्यांचा प्रत्यक्ष चळवळीत सहभाग होता. कार्ल मार्क्स आणि नारायण मे. लोखंडे यांच्या विचारात विलक्षण साम्य आढळुन येते. कामगार वर्गाची पिळवणुक थांबावी हा हेतु डोळयासमोर ठेऊन चळवळीची उभारणी उभयतांनी केली होती.

फ्रेंच साम्यवादाचा अभ्यास करण्यासाठी मार्क्स पॅरीसला गेले तेव्हा फ्रेंच आणि जर्मन कामगार वर्गाच्या साम्यवादी संघटनांशी त्यांचा संबंध आला. पुढे मार्क्सला फ्रांस सरकारने हद्दपार केले. वर्गविहीन समाजरचना निर्माण करण्यासाठी कामगार वर्गाचा विजय होऊन शेवटी समताप्रधान साम्यवादी समाजरचना निर्माण होऊ शकेल असे मत त्यांनी मांडले. 1949 साली मार्क्स लंडनला गेले. 1850 ते 1864 या काळात आर्थिक आणि कौटुंबिक विवंचना त्यांना सहन करावी लागली. 1864 अखेरीस मार्क्स “इंटरनॅशनल वर्कींग मेन्स असोसीएशन” या संख्येत सहभागी झाले. ब्रिटीश कामगारांचे दैन्य आणि दुरावस्था त्यांनी जवळुन अनुभवली होती.

नारायण मे. लोखंडे यांचा विचार करता त्यांनी कामगारांना संघटीत करुन निर्माण केलेली कामगार संघटना ही एक क्रांतीकारी घटना होती. कामगार चळवळीतील कार्य, सत्यशोधक विचारवंत आणि त्यागी लोकनेता याबरोबरच त्यांच्या सर्वांगीण कारकीर्दीचे विश्लेषण प्रस्तुत विषयातुन करता येईल. म्हणुन 1818 ते 1897 ही प्रस्तुत शोधप्रबंधाची व्याप्ती असेल.

संशोधन विषयाची उद्दिष्टे

संशोधकाची उद्दिष्टे ही संशोधकाचे संशोधन विषयक कार्य सुनियंत्रित पदधतीने करण्यासाठी दिशादर्शक म्हणुन कार्य करतात. प्रस्तुत विषय “कार्ल मार्क्स आणि नारायण मे. लोखंडे यांच्या कामगार चळवळीचा तुलनात्मक अभ्यास या अनुशंगाने संशोधनासाठी काही उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

1) कार्ल मार्क्स याचे साहित्य आणि विचार याचा कामगार चळवळीचा दृष्टीकोनातुन शोध घेणे.
2) कार्ल मार्क्स आणि नारायण मे. लोखंडे यांच्या कामगार चळवळीतील साधर्म्य आणि भेदाचे स्पष्टीकरण करणे.
3) कार्ल मार्क्स आणि नारायण मे. लोखंडे यांच्या शोषनमुक्त आणि समतावादी विचारांचा अभ्यास करणे.
4) मार्क्सप्रणीत वर्गसिदधांताच्या अनुशंगाने भारताता कामगार वर्गात प्रचलीत असलेल्या सामाजिक, जातीविषयक आणि वर्गीय प्रश्नासंबंधी नारायण मेघाजी लोखंडे यांच्या कार्याचा शोध घेणे.
5) जागतिक स्तरावर वैचारीक सिद्धांताची मांडणी सुरु असताना नारायण मेघाजी लोखंडे यांनी कामगारांना सोबत घेऊन उभारलेला लढा प्रकाशझोतात आणणे.
6) नारायण मेघाजी लोखंडे यांच्या सत्यशोधक चळवळ व दीनबंधु वुत्तपत्रातुन कामगारासाठी दिलेल्या योगदानाचा शोध घेणे.
7) प्लेग साथ रोगात कामगारांच्या आरोग्यासाठी नारायण मे. लोखंडे नी केलेल्या कार्याचा शोध घेणे.
8) नारायण मेघाजी लोखंडे यांच्या त्याग व चळवळीचा वाहुन घेण्याच्या वृत्तीमुळे सरकारी धोरण आणि कायद्यात झालेल्या बदलाचा शोध घेणे.
9) कार्ल मार्क्स आणि नारायण मे. लोखंडे यांच्या कार्याची विस्तृतपणे तुलनात्मक मांडणी करणे.

संशोधन विषयाची गृहितके

कोणत्याही विषयाचे शास्त्रशुद्ध पद्धतीने अध्ययन करण्यासाठी संशोधन संबंधित विषयाचे ज्ञान असणे आवश्यक असते. पुर्वज्ञानाच्या आधारे गृहीतके निश्चित केली जातात.

लुंडबर्ग यांच्या मते " गृहितकृत्ये हे एक सामाजिक आणि कामचलाऊ सामान्यीकरण किंवा निष्कर्ष आहे. की त्याच्या सत्यतेची परीक्षा घेणे अजुन बाकी आहे. संशोधनाच्या प्रारंभिक अवस्थेत गृहीतके एक अनुमान मनोकल्पीत कल्पनापुर्ण विचार, सहजज्ञान किंवा आणखी काही असु शकते. जे क्रिया किंवा संशोधनाचा आधार बनते.

1) औद्योगिकरणामुळे भांडवलदारवर्ग आणि कामगार वर्गाची उदय झाला. भांडवलदार वर्गाकडुन कामगार वर्गाची होणारी पिळवणुक हा आधारभुत घटक मानुन कार्ल मार्क्स आणि नारायण मे. लोखंडे यांनी कार्य केले.
2) समाजात शोषक आणि शोषीत यांचे अस्तित्व राहिले आहे. या शोषीत वर्गाच्या कल्याणासाठी कार्ल मार्क्स आणि नारायण मे. लोखंडे यांनी आपले जिवन वेचले.
3) ज्याप्रमाणे मार्क्सने शोषीत वर्गाला सातत्याने समता, स्वातंत्र्याची प्रेरणा देऊन क्रांतीसाठी प्रेरीत केले. त्याप्रमाणे नारायण मे. लोखंडे यांनी कामगारांनी जागृत करुन चळवळ उभारली आणि भारतीय कामगार चळवळीचे जनकत्व स्विकारले.
4) समाजप्रबोधन आणि आपल्या विचारांच्या प्रचार प्रसारासाठी कार्ल मार्क्स आणि नारायण मेघाजी लोखंडे यांनी वृत्तपत्र या प्रभावी माध्यमाचा वापर करुन जनसामान्यापर्यंत आपले विचार पोहचविले.
5) विसाव्या शतकात संपुर्ण जगावर आपला प्रभाव दाखवणारी मार्क्सवादी विचारसरणी आणि नारायण मेघाजी लोखंडे यांची विचारसरणी आणि कार्यपध्दती यामध्ये काही साम्य आणि भेद आढळुन येतात.
6) स्त्रिया, बालकामगार, अस्पृश्यवर्गाचे प्रश्न त्याचबरोबर प्लेगनिवारण आणि सत्यशोधक चळवळीतील नारायण मे. लोखंडे यांचे कार्य उल्लेखनीय असे आहे.
7) सद्यस्थितीत निर्माण झालेल्या राजकीय आणि सामाजिक परीस्थितीचे विश्लेषण करण्यासाठी उभयतांचे विचार आणि कार्यपध्दती उपयुक्त ठरु शकते.

संशोधन पदधतीची साधने

संशोधन ही अखंडीतपणे चालणारी दीर्घकालीन प्रक्रिया आहे. ऐतिहासिक संशोधनाबाबतही हेच सत्य आहे. इतिहास हे एक सामाजिक शास्त्र असल्यामुळे सामाजिक शास्त्रात प्रचलीत असलेल्या संशोधन पद्धती इतिहास विषयातही उपयोगी पडतात.

तथ्य संकलनासाठी प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा वापर केला आहे.

अ) प्राथमिक साधने :-

1. दिनबंधु वृत्तपत्राचे अंक
2. नारायण मे. लोखंडे यांनी कामगारांच्या हक्कासाठी केलेला पत्रव्यवहार
3. नारायण मे. लोखंडे यांच्या वंशजांची मुलाखत.

आ) दुय्यम साधने :-

1. संदर्भ ग्रंथ
2. संदर्भ साहित्य
3. मासिके
4. शब्दकोष
5. वर्तमानपत्रे
6. साप्ताहिके
7. पाक्षिके

संशोधन आराखडा / प्रकरण नियोजन

प्रास्ताविक

प्रास्ताविक या प्रथम प्रकरणामध्ये प्रस्तुत विषयाची पार्श्वभुमी विषद करण्यात येईल. 18 व्या शतकातील औद्योगिक क्रांतीच्या उदयानंतर कामगार वर्ग आणि भांडवलदार वर्ग उदयास आले. कामगार वर्गाच्या समस्यांची सोडवणुक करण्यासाठी कार्ल मार्क्स आणि नारायण मे. लोखंडे यांच्या कामगार चळवळीचा आढावा घेण्यात आला आहे.

19 व्या शतकात कार्ल मार्क्सने मांडलेले जहाल विचार आणि त्या विचारांना दिलेली व्यावहारीकतेची जोड त्यामुळे जगातील कामगार वर्गाला भांडवलदाराच्या अन्यायापासुन स्वत:चे संरक्षण करता आले. कार्ल मार्क्स यांनी आपल्या अशा कामगार चळवळीतील आग्रदुताच्या विचारांचा यामध्ये आढावा घेतला आहे.

भारताचा विचार करता भारताची राजधानी मुंबई याठिकाणी नारायण मेघाजी लोखंडे यांनी 1 मे 1880 साली दीनबंधु वृत्तपत्र स्वत: चालवण्यास घेतले. कामगारांवर होणारा अन्याय अत्याचार वृत्तपत्राच्या माध्यमातुन मांडला. कार्ल मार्क्स आणि नारायण मे. लोखंडे यांचे कार्य हे कामगारांच्या अन्यायाला वाचा फोडुन त्यांच्या न्याय हक्कासाठी चळवळ करणारे होते. उभयतांच्या विचार आणि कृतीमध्ये भेद नव्हता. परंतु पाश्चात्य व भारतीय यांच्या सामाजिक व धार्मिक बाबी वेगवेगळया होत्या. त्यामुळे जात, वर्ण, लिंग या नुसार कामगारांचा दर्जा ठरवला जाई यामुळे भारत व पाश्चात्य देशातील कामगार यांच्या शोषणात तफावत दिसते त्याचा शोध प्रस्तुत प्रबंधात तटस्थपणे घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल्.

कार्ल मार्क्स यांचे प्रारंभीक जिवन

कार्ल मार्क्स यांचा जन्म 5 मे 1818 ला जर्मणीतील ऱ्हाइनलँड या प्रांतातील ट्रीयर शहरात झाला. बर्लीन येथे हेगेल विचारांच्या प्रभावामुळे डाव्या अनिश्वरवादी/ नास्तीक म्हणुन प्रसिध्दीस आले. 1842 ला जर्मनीतील कोलोन या शहरातुन प्रसिध्द होणाऱ्या – हाइनीश्चे झाइटुंग या वृत्तपत्रात त्यांनी लिखान केले. रशियन सरकारच्या दबावामुळे जर्मनीतील सत्ताधीशांनी हे वृत्तपत्र बंद पाडले. 1843 साली त्यांनी जेनी व्हान वेस्टफॉलेन या आपल्या मैत्रीणीशी विवाह केला. फ्रेंच साम्यवादाच्या अभ्यासासाठी पॅरीसला गेलो. तेथे त्यांच्या लिखानामुळे जर्मन सरकारचा रोष लक्षात घेऊन त्यांना हद्दपार करण्यात आले. तेथुन ते ब्रुसेल्स ला गेले तेथे फेड्रीक एंगल्स यांच्याशी मैत्री झाली. "द लिग ऑफ द जस्ट" नामक गुप्त मंडळी जुन 1847 ला लंडनला जमली. त्या लीगमध्ये मार्क्स शामील झाले. "कम्युनिस्ट लिग" असे त्या लिगचे नाव ठेवले. वर्गविग्रह, वर्गविहीन समाजरचना होऊन कामगारवर्गाचा विजय होइल असा साम्यवादाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. फ्रांन्स, इटली, ऑस्ट्रेलिया, या देशात 1848 च्या पुर्वार्धात क्रांतीची लाट उसळली. क्रांतीकारक गटाने मार्क्सला पॅरीसला बोलावले आणि राजसत्ता नष्ट करण्याचे आवाहन केले त्यास मार्क्सने नकार दिला. "न्यु ऱ्हाइनिश्चे झाइटुंग" (1849) मध्ये स्थापन झालेले वृत्तपत्र त्यामध्ये मार्क्स आपले विचार मांडु लागले. 14 मार्च 1883 साली कार्ल मार्क्स यांचा मृत्यु झाला.

कार्ल मार्क्स यांचा कामगार चळवळीतील सहभाग आणि कार्य

"न्यु ऱ्हाइनिश्चे झाइटुंग" या वृत्तपत्रात मार्क्सने आपले मत मांडले जर्मनीच्या सम्राटाने बर्लीनची लोकसभा बरखास्त केली त्याविरुध्द मार्क्सने सशस्त्र उठाव करण्यासाठी आवाहन केले व कोलोन या शहरात कामगारांच्या जमावापुढे भाषण केले. मार्क्सवर राजद्रोहाचा खटला भरला. मार्क्सने आपली बाजु संवैधानिक असल्याचे मत मांडले आणि दोषमुक्त झाले मात्र घटनेच्या अनुसार संसदेची पुन्हा स्थापना करण्यात अपयश आल्यामुळे 16 मे 1949 ला मार्क्स यांना हद्दपार करण्यात आले. मार्क्स पॅरीसला गेले तेथुनही हद्दपार केल्या गेले. ते लंडनला गेले तेथे कम्युनिष्ट लीगमध्ये शामील होऊन डाव्या जहाल क्रांतीकारी राजकारणाचा त्यांनी पुन्हा पुरस्कार केला. कामगारवर्गाच्या वैचारीक शिक्षणावर त्यांनी विचार मांडले. त्यांचा 1850 ते 1864 हा काळ यातना आणि आर्थिक विवंचना यातच गेला.

1864 अखेर कार्ल मार्क्स "इंटरनॅशनल वर्कींग मेन्स असोसिएशन" या संख्येत सामील झाले. 28 सप्टें 1864 या संस्थेची सार्वजनिक सभा झाली तेथे जर्मन कामगारांचा प्रतिनीधी म्हणुन उपस्थित राहिले. 1867 साली कामगारवर्गाला मतदानाला हक्क मान्य झाला.

दास कॅपिटल आणि कार्ल मार्क्स

इंटरनॅशनल वर्कींग मेन्स असोसिएशन या संघटनेत कामगारांचा पवित्र ग्रंथ म्हणुन या ग्रंथाचे वर्णन आहे. Thas Capital हा ग्रंथ बर्लीन येथे 1867 साली प्रथम प्रकाशीत झाला. Thas Capital भाग एक आणि भाग दोन सुद्धा कार्ल मार्क्स यांनी लिहीला परंतु त्यांच्या मृत्युनंतर इ.स. 1885 आणि 1894 मध्ये एंगेल्स यांनी ते ग्रंथ प्रकाशीत केले जागतिक भांडवलशाहीमुळे कामगार वर्गाचे शोषण होते हे मार्क्सने दाखऊन दिले.

“क्रिटीक ऑफ पॉलिटिकल इकोनॉमी “ या मार्क्स यांच्या ग्रंथात उत्पादन व्यवस्थेत होणारे बदल आणि समाजाच्या ग्रंथात उत्पादन व्यवस्थेत होणारे बदल आणि समाजाच्या आर्थिक रचनेचे वर्णन केले आहे. युरोपीय कामगारांना चळवळ उभी करताना मार्क्सवादी विचारांपासुन चालना मिळाली.

“दास कॅपीटल” या ग्रंथामुळे कामगार वर्गाला क्रांती करण्यासाठी भांडवलशाही आणि कामगार क्रांतीबद्दल महत्वपुर्ण विश्लेषण केले आहे. भांडवलशाहीचा विभास होत असताना कामगारांना काय स्थान आहे, त्यांनी क्रांती कशी करावी याबद्दल समग्र विश्लेषण सैद्धांतीक दृष्टीकोनातुन मांडलेले आहे. “जिवंत माणसांच्या अंगचि शारीरीक व मानसिक कुवत म्हणजे श्रमशक्ती” अशी व्याख्या या ग्रंथात मार्क्सने केली आहे.

नारायण मेघाजी लोखंडे यांचे प्रारंभिक जीवन

कामगार चळवळीचे आग्रदुत नारायण मेघाजी लोखंडे यांचा जन्म 1848 साली ठाणे याठिकाणी झाला त्यांचे मुळ गाव पुणे जिल्हातील कन्हेरसर हे होते. ठाणे याठिकाणी त्यांचे शिक्षण झाले (1848-69) मॅट्रीकपर्यंत शिक्षण झाल्यानंतर ते उदरनिर्वाहासाठी मुंबई येथे भायखळा भागात आले व वास्तव्य केले. त्यांच्या पत्नीचे नाव गोपिकाबाई असे होते. नारायण मे. लोखंडे यांनी मुंबईत आल्यानंतर रेल्वेत नोकरी केली. (1868) या नोकरीस त्यागपत्र देऊन त्यांनी 1869 साली पोस्टात नव्याने नोकरीला सुरुवात केली. 1870 साली त्यांनी कोठी कारकुन (स्टोअर कीपर/ भांडारपाल) म्हणुन गिरणीत नोकरी केली. तेथे त्यांनी कामगारांच्या समस्या अगदी जवळुन पाहिल्या येथेच त्यांच्या भावी गिरणी कामगार चळवळीच्या उदयाची पार्श्वभुमी तयार झाली. सुरुवातीला सत्यशोधक चळवळीचा एक भाग म्हणुन मुंबईतील गिरणी कामगारांच्या कल्याणाचे आणि त्यांच्या किमान हक्क संरक्षणाचे कार्य चालु करण्यात आले. महात्मा फुले यांची प्रेरणा त्यामागे होती. नारायण मे. लोखंडे हे ज्योतीराव फुले यांचे निकटवर्ती व कर्तुत्वसंपन्न सहकारी होते. नारायण लोखंडे यांनी आपल्या संसारावर तुळशीपत्र ठेऊन हयातभर गिरणी कामगारांचेच संसार फुलविण्याचा वसा घेतला. 1890 साली “बाँबे मीलहँड असोसिएशन” ही कामगारांची भारतातील पहिली संघटना स्थापन करुन कामगार चळवळीचे जनक बनले. प्लेगची साथ निवारणासाठी त्यांनी मुंबई येथे मराठा हॉस्पीटलची स्थापना केली. (1896) आणि प्लेग निवारणासाठी केलेल्या धडपडीतच त्यांना प्लेगची लागण झाली. प्लेगच्या साथीत वयाच्या अवघ्या 49 व्या वर्षी त्यांचे दु:खद निधन झाले.

नारायण मेघाजी लोखंडे यांचा कामगार चळवळीतील सहभाग आणि कार्य

कावसजी दावर यांनी मुंबई प्रांतात “स्पिनींग अँन्ड विव्हींग कंपनी” या नावाची पहिली गिरणी 7 जुलै 1854 रोजी सुरु केली. सन 1875 मधील देशातील विविध ठिकाणच्या गिरण्यांची संख्या विचारात घेता त्यावेळी मुंबईत-41, कलकत्ता-5, मद्रास-2, कानपुर-3 आणि हैद्राबाद, इंदुर आणि नागपुर याठिकाणी प्रत्येकी 1 अशा 54 गिरण्या चालु झाल्या होत्या.

“बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशन” ही मुंबईतील गिरणी मालकांनी संघटना स्थापली. मुंबई रॉयल मिलचा अधिकारी “बाउन” यांनी सरकारला कळवले की स्त्रीया व 12 वर्षाखालील मुलांची पिळवणुक होत आहे. म्हणुन फॅक्टरी □क्ट करणे गरजेचे आहे. 1881 साली पहिला फॅक्टरी □क्ट मंजुर करण्यात आला. गिरणीमालकांच्या दबावामुळे त्यातील तरतुदी सौम्य आणि मर्यादित होत्या. 1881 च्या या फॅक्टरी □क्टवर नारायण मे. लोखंडे यांनी टीका केली. कामगार हितासाठी कामगार संघटनेची आवश्यकता लक्षात घेऊन. 1884 साली “बॉम्बे मिल हँड्स असोसिएशन” ही देशातील पहिली कामगार संघटना स्थापन केली.

ब्रिटीश सरकारने मँचेस्टर येथील कापडगिरण्यांतील “मिडकींग” नावाच्या कारखाना तपासणीसाची नियुक्ती फॅक्टरी □क्टच्या अंमलबजावणी निरीक्षणपदी केली. मिडकींग यांनी सरकारला अहवाल सादर केला. या अहवालामुळे सरकारने पुढील निर्णय घेतला. त्यामध्ये नारायण मेघाजी लोखंडे आणि इतर 35 जाणकारांच्या चौकशी मंडळासमोर परिणामकारक साक्षी झाल्या त्यामुळे सरकारला काही निर्णय घ्यावे लागले ते पुढीलप्रमाणे.-

1) सकाळी 7 ते 5 कामाचे तास
2) जेवण आणि विश्रांतीसाठी 1 तास अवधी
3) मुली, स्त्रियांना महिन्यातुन 4 सुट्या
4) कामगारांसाठी आरोग्यसुविधा

वरील मोक्याच आणि तुटपुंज्या तरतुदी विरोधात कामगार संघटीत होत गेले. नारायण मेघाजी लोखंडे यांच्या नेतृत्वाखाली 23 सप्टेंबर आणि 26 सप्टेंबर 1884 साली कामगारांची पहिली सभा मुंबईतील परळ येथे झाली. त्यामध्ये चार हजार कामगारांनी उपस्थिती दर्शविली. फॅक्टरी कमीशनचे अध्यक्ष डब्लु. बी. मुलक यांना कामगारांच्या मागणीचे निवेदन सादर करण्यात आले.1891 मध्ये ब्रिटिशांच्या शाही कमीशनसमोर प्रभावीपणे नारायण मे. लोखंडे यांनी कामगारांची अवस्था मांडली.

सत्यशोधक चळवळ, दीनबंधु मधील कार्य आणि प्लेग निवारण विषयक कार्य

महात्मा फुलेंनी 1873 साली सत्यशोधक समाजाची स्थापना केली. विशुद्ध वैचारिक बैठक, शाश्वत तत्वज्ञान, सत्य, समता व बंधुता यावर आधारलेली ही पहिलीच चळवळ विषमता शोषन व गुलामगिरी याविरुध्दचा हा खरा संग्राम होता. या चळवळीच्या प्रसारासाठी 1877 ला दीनबंधु हे वृत्तपत्र महात्मा फुले, कृष्णराव भालेराव, मुक्ताजी अप्पाजी कांबळे यांच्या सहकार्याने शिळा प्रेसवर सुरु केले.

9 मे 1880 साली नारायण मेघाजी लोखंडे यांनी दीनबंधु हे साप्ताहिक मुंबई येथुन प्रकाशीत करण्यास सुरुवात केली. नारायण मे. लोखंडे हे जसे समर्थ कामगार नेते होते तसेच ते एक अष्टपैलु बुद्धीमान कल्पक पत्रकार म्हणुन मान्यता पावले होते. सत्यशोधक समाजाची शिकवण त्यांनी "दीनबंधु" वृत्तपत्रातुन समर्थपणे दिली. शुद्र, स्त्री पुरुष, शेतकरी, कामगार यांमध्ये जागृती निर्माण करण्याचे कार्य प्रभाविपणे केले. मानवतेचा, मानवी समतेचा पुरस्कार व प्रसार सातत्याने चालु ठेवला.

वारंवार येणा-या प्लेगच्या साथीने हजारो लोक मृत्युमुखी पडत. गोरगरीबांना उपचाराच्या क्वचीतच सुविधा मिळत. ही महत्वाची निकड पुर्ण करण्यासाठी नारायण मेघाजी लोखंडे यांनी 1896 साली मराठा हॉस्पीटलची स्थापना केली. या कामी अनेक सत्यशोधकांनी त्यांना मदत केली. हजारो गोरगरीबांचे त्यामुळे प्राण वाचले.

नारायण मेघाजी लोखंडे यांना मिळालेले मानसन्मान आणि त्यांचे साहित्य

अ) मानसन्मान :-

1) नारायण मे. लोखंडे यांनी समतेवर आधारीत कामगार चळवळ केल्यामुळे ब्रिटीशांनी त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी त्यांचा यथोचीत सन्मान केला त्यात 1890 साली नारायण मे. लोखंडे यांना “जस्टीस ऑफ पीस” ही पदवी ब्रिटीश सरकारने दिली. (1890)

2) 1893 च्या हिंदु मुस्लीम दंगल आणि प्रक्षोभ दुर करण्यासाठी उभय पक्षांच्या सभा घेऊन क्षुब्ध झालेली मने शांत करण्याचे भगीरथ प्रयत्न नारायण मे. लोखंडे यांनी केले. या थोर कार्याचा गौरव म्हणुन सरकारने “रावबहादुर” हा बहुमानाचा किताब बहाल केला. (1895)

ब) साहित्य :-

नारायण मे. लोखंडे यांनी साहित्याच्या माध्यमातुन कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे महान कार्य केले. प्रत्यक्ष कृती व लेखणीच्या माध्यमातुन त्यांनी कामगारांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. त्यात-

1) सत्यशोधक निबंधमाला अथवा हिंदु धर्माचे खरे ज्ञान -भाग 1 (सप्टेंबर 1886)

2) सत्यशोधक निबंधमाला अथवा हिंदु धर्माचे खरे ज्ञान - भाग 1 (मे 1887)

3) दिनबंधुचे संपादक म्हणुन लिखान

4) पंचदर्पन अथवा सर्व जातीचे उपयोगी पडणारे नियम.

कार्ल मार्क्स आणि नारायण मेघाजी लोखंडे यांच्या कामगार चळवळीचा तुलनात्मक अभ्यास

1) युरोपात सुरु झालेल्या औद्योगिकीकरणातुन उदयास आलेला भांडवलदार वर्ग आणि कामगार वर्ग यामधील कामगारवर्गाला केंद्रस्थानी ठेऊन उभयतांनी आपली भुमीका मांडली.
2) कार्ल मार्क्स यांनी कामगारविषयी सिध्दांत मांडत असताना भांडवलदार आणि कामगार असे केवळ दोनच घटक सर्व प्रश्नांच्या मुळाशी कारणीभुत असल्याचे प्रतिपादन केले. परंतु तत्कालीन परीस्थितीत भारतात कामगारवर्गात असलेल्या जातीव्यवस्था, लिंगभेद, स्पृश्यास्पृश्यता, बालकामगार इ. प्रश्नांवर नारायण मे. लोखंडे यांनी प्रकाश टाकला.
3) कार्ल मार्क्स यांनी वर्गसंघर्ष, भौतिकवादी, विश्लेषण, क्रांतीची भुमीका आणि इतर संकल्पना युरोपची तत्कालीन परीस्थीती समोर ठेऊन मांडल्या आहेत. तर नारायण मे. लोखंडे यांनी भारतातील पर्यायाने मुंबईतील राजकीय, सामाजिक परीस्थीती लक्षात घेऊन आपले कार्य केले.
4) भांडवलदार हे श्रमीकांच्या श्रमशक्तीचा फायदा घेतात आणि अधीक नफ्यासाठी कामगारांचे शोषन होते. यावर उपाय म्हणुन मार्क्स कामगारक्रांतीचा मार्ग सांगतो. नारायण मे. लोखंडे यांनी चळवळ करुन आपल्या मागण्या मान्य करण्यावर भर दिला.
5) कामगारवर्गाची पिळवणुक थांबावी हा उदात्त हेतु डोळयासमोर ठेऊन कार्ल मार्क्स आणि नारायण लोखंडे यांनी चळवळींची उभारणी केली.
6) कार्ल मार्क्स यांनी शोषीत वर्गाला सातत्याने समता, स्वातंत्र्यताची प्रेरणा देऊन क्रांतीसाठी प्रेरीत केले त्याप्रमाणे नारायण मे. लोखंडे यांनी कामगारांना आपल्या हक्काप्रती जागृत करुन एकजुट केले आणि कामगार चळवळ उभारली.
7) कार्ल मार्क्स आणि नारायण मे. लोखंडे यांनी आपापल्या परीने कामगारवर्गाप्रती कार्य केले. प्रत्यक्ष संघर्ष केला. तुलनात्मकदृष्टया विचार करता कार्ल मार्क्स यांच्या विचारांचा मोठया प्रमाणावर प्रचार प्रसार झाला असे दिसुन येते.

निष्कर्ष

प्रस्तुत प्रकरणामध्ये वरील संशोधनाच्या आधारे जे निष्कर्ष निघतील ते मांडण्यात येतील. तसेच काही शिफारशी व सुचना सुचविण्यात येतील.

वरील प्रकारे प्रस्तुत शोध प्रबंधाची रुपरेखा असली तरी संशोधन करताना उपलब्ध झालेल्या साधनांद्वारे काही परीवर्तन अपेक्षित असु शकतो.

संदर्भ ग्रंथसुची

1) म. फुले आमच्या समाजक्रांतीचे जनक- धनंजय किर
2) व्यक्ती आणि विचार- य. दी. फडके
3) सत्यशोधक समाज हिरक महोत्सव ग्रंथ- (संपा)- मा. खं. बागल
4) महाराष्ट्राचे शिल्पकार नारायण मेघाजी लोखंडे- प्रा. डॉ. मा. गो. माळी

5) मार्क्स - आंबेडकर समन्वयवादाचे जनक : रावसाहेब कसबे प्रा. डॉ. संजय गायकवाड
6) काही प्रमुख राज्यशास्त्रज्ञ - पदमाकर सिद्धांर्थ काने
7) मार्क्सवाद और साहित्य- महेंद्रचंद्र राय
8) प्रमुख राजकिय विचारप्रणाली- डॉ. सुनिल दाते
9) पाश्चिमात्य राजकिय विचारवंत - प्रा. डॉ. सुधाकर ग. जोशी
10) पाश्चिमात्य आणि भारतीय राजकीय विचारवंत - दिगांबर डी. बिरादार
11) राज्यशास्त्राचे सिद्धांत आणि राजकीय विश्लेषण - प्रा. रा. अं. तिजारे
प्रा. चिं. ग. घांग्रेकर
12) आधुनिक जगाचा इतिहास - प्रा. सौ. अरुणा अर्जुण मोरे
डॉ. राजेंद्र पोपटराव भांबरे
13) आधुनिक युरोपचा इतिहास (इ.स. 1789 - 1945)- मदन मार्डीकर
14) मार्क्सवाद -उत्तर मार्क्सवाद - प्रा. अशोक चौसाळकर
15) आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (इ.स. 1818 ते 1960) - डॉ. एस. जी. जाधव
16) मार्क्स- आंबेडकर समन्वयी परीप्रेक्ष्यातुन शिक्षण आणि रोजगार - डॉ. संजय पंढरीनाथ गायकवाड
17) Karl Marx and Engles F, on Religion, Progressive Publishers, Moscow- 1976
18) Cotton Mills in India by S. D. Mehta (1854 to 1954)

संशोधक

दुथडे कोमल गणपतराव

मार्गदर्शक

प्रा.डॉ.प्रकाश संभाजी वाघमारे
इतिहास विभाग प्रमुख
नारायणराव वाघमारे महाविद्यालय
आखाडा बाळापुर, जि. हिंगोली.